**समग्र शिक्षा अंतर्गत व्यवस्थापन व कार्यक्रमातंर्गत करार पध्दतीने कार्यरत कर्मचाऱ्यांना मानधनात १० टक्के वाढ करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:-समग्र-२०२२/प्र.क्र. २८९/एसडी-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- १८ सप्टेंबर, २०२३.

**संदर्भ:-**

राज्य प्रकल्प संचालक (समग्र शिक्षा), महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचे पत्र क्रमांक जा.क्र.मप्राशिप/सशि/प्रशा/२०२२-२३/३०४८, दिनांक ११.११.२०२२

**प्रस्तावना:-**

सर्व शिक्षा अभियानाची अंमलबजावणी सन २०००-२००१ पासून देशभरात झाली आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १८.१.२००२ च्या शासन निर्णयान्वये सर्व शिक्षा अभियानाची अंमलबजावणी राज्यात करण्याचा निर्णय घेण्यात आला व सदर अभियानाच्या अंमलबजावणीची जबाबदारी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्याकडे सोपविण्यात आली. सदर संस्था ही "सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट, १८६० व मुंबई विश्वस्त अधिनियम १९५० अन्वये पंजीकृत करण्यात आली आहे. सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान व शिक्षक शिक्षण या पूर्वाश्रमीच्या(Erstwhile) योजना एकत्र करून गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण देण्यासाठी शालेय शिक्षणासाठी एकात्मिक योजना म्हणून समग्र शिक्षा ही केंद्रपुरस्कृत योजना सन २०१८-१९ पासून भारत सरकारने सुरु केली आहे.भारत सरकारने समग्र शिक्षा ही योजना दिनांक ०१ एप्रिल, २०२१ ते दिनांक ३१ मार्च, २०२६ कालावधीसाठी पुढे सुरू ठेवण्यास मान्यता दिली आहे.

सर्व शिक्षा अभियानाची अंमलबजावणीच्या दृष्टीने मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांनी निर्गमित केलेल्या मॅन्युअल ऑन फायनान्शिअल मॅनेजमेंट ॲन्ड प्रोक्युअरमेंट २००४ मधील नियम ३७ (मॅनेजमेंट कॉस्ट) अन्वये सर्व शिक्षा अभियानांतर्गत पदांना मंजूरी देताना नवीन पदनिर्मिती करू नये तसेच निर्माण केलेली पदे केवळ कंत्राटी अथवा प्रतिनियुक्तीने भरण्यात यावीत. सदर पदे भरल्यामुळे सोसायटी अथवा राज्य शासनावर कायमस्वरूपी दायित्व येता कामा नये, असे नमूद केले आहे. सदर कंत्राटी कर्मचा-यांना केंद्र शासनाने मंजूर केलेल्या एकक दराने मानधन अनुज्ञेय आहे. राज्य स्तरावरील कार्यालयात ६४ व जिल्हा स्तरावरील कार्यालयात ६१८७ असे एकूण ६२५१ कर्मचारी कार्यरत आहेत. या कर्मचाऱ्यांच्या मानधन वाढीच्या प्रस्तावाला केंद्र शासनाने मंजूरी दिलेली नाही, यास्तव, सदर खर्च राज्य शासनाला करावा लागणार आहे. सबब, समग्र शिक्षा अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचा-यांच्या मानधनात १० टक्के वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय:-**

१. समग्र शिक्षा, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचारी यांच्या सद्याच्या मानधनात १० टक्के वाढ करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर मानधन वाढ या शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागू राहील.

३. सदर १० टक्के वाढीची रक्कम यापुढे या योजनेच्या राज्य हिस्सामध्ये अतिरिक्त निधी म्हणून उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदरचा खर्च हा या योजनेचे लेखाशिर्ष मागणी क्र. ई-२ १०६ ,शिक्षक आणि इतर सेवा (००) (००) (०१) समग्र शिक्षा अभियान (सर्वसाधारण ) राज्य हिस्सा ४० टक्के (कार्यक्रम) (२२०२I६१२) मधून भागविण्यात येईल.

३. सदरचा शासन निर्णय मा. मंत्रीमंडळाच्या दिनांक १६.०९.२०२३ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मंजुरीच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

४. प्रस्तुस्त शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२३०९१८१६३२४८०१२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

IMTIYAZ
MUSHTAQUE KAZI

Digitally signed by IMTIYAZ MUSHTAQUE KAZI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT, 2.5.4.20=39a40419de755c2eab61fb555b2fdf8c8d6d652ff18fdffbd9c748ab01f6da04, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=77A529748C5E7C1BA7A66E81C654BA3C492FDA5B29E076241DB1BA213DDEDF4E, cn=IMTIYAZ MUSHTAQUE KAZI
Date: 2023.09.20 11:38:45 +05'30'

**( इ. मु. काझी )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. मंत्री (शालेय शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा / विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
६) मा. विधानसभा / विधानपरिषद सदस्य
७) अपर मुख्य सचिव नियोजन विभाग मंत्रालय, मुंबई-३२.
८) अपर मुख्य सचिव वित्त विभाग मंत्रालय, मुंबई-३२.
९) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) राज्य़ प्रकल्प संचालक (समग्र शिक्षा) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
११) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१२) महालेखापाल (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१३) ग्रंथपाल, विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई.
१४) निवडनस्ती, एस डी १.